नियमीत दिवाणी दावा क्र.१००/२०२३
सुधाकर बनसोड वि. नारायण पार्थीकर
निशाणी १५/क सोबत

<u>मी शपथेवर निवेदन करते की,</u>

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २ विमल दत्तात्रय पार्थीकर यांचा साक्षीपुरावा</u>

<u>साक्षीदाराचा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एन. बी. सोनवणे यांच्या मार्फत</u>

०३. नोंदणीकृत खरेदी दस्त क्र.५३५८/२००१ अन्वये गट नं.३२ मधील मी २२ आर जमीन दि.०६.१२.२००१ रोजी खरेदी केलेली आहे. आता मला नि.क्र.१७/१ वरील खरेदी पत्र दाखवण्यात आले, ते मला मान्य आहे. त्यामुळे त्याला **<u>नि.क्र.१८</u>** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण....**

<u>साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. पाटील यांच्या मार्फत</u>

०४. माझे ७ वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. मराठी लिहिता वाचता येते. मी पार्थी गावामध्ये माझे लग्न झाल्यापासुन म्हणजेच सन १९७७ पासुन राहते. वादी व प्रतिवादी हे दोन्ही सख्खे भाऊ आहे. त्यांना देखील ४० वर्षापासुन मी ओळखते. दोघेही आमचे भाऊबंद आहेत. मी खरेदी केलेली जमीन ही बापुराव बनसोड यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे.

०५. बापुराव बनसोड यांना एकुण ६ अपत्य होती. मी खरेदी केलेली मिळकत बापुराव बनसोड यांची वडीलोपार्जीत मिळकत होती, हे म्हणणे खरे आहे. जमीन खरेदी करतांना अपत्यांची तोंडी संमती घेतली होती, लेखी संमती घेतलेली नाही. २२ आर

जमीनीमध्ये बापुराव बनसोड व त्यांची मुले यांच्यामध्ये वाटणी झाली किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही.

०६. मी २००२ मध्ये शेती व घरकाम करत होते. माझया पतीच्या नावे पार्थी येथील गट नं.३६ व ३७ मध्ये शेती होती. या जमीनीतुन मिळणा-या आर्थिक व्यवहार माझे पती पाहत होते, हे म्हणणे खरे आहे. शेत जमीन बापुराव यांच्याकडुन विकत घेत असतांना पैसे माझ्या पतीने दिले होते, हे म्हणणे खरे आहे. खरेदीबाबतच्या व्यवहारातील पैसे मी दिलेले नाहीत, हे म्हणणे खरे आहे. खरेदी केलेली जमीन मी विकली त्यादिवशी मोजणी संदर्भात खाजगी मोजणीदार आणला होता, त्याचे नाव मला सांगता येणार नाही. मोजणी झाल्यानंतर त्या जमीनीवर जाण्याचा योग मला आला आहे.

०७. २२ आर जमीनीलगत माझी शेती असल्यामुळे मी शेतात जाते त्यावेळी सुधाकर कधी कधी मला भेटतो व बोलतो. सुधाकर हा २२ आर जमीनीचा मालक व ताबेदार आहे. प्रतिवादी आमच्या जमीनीबाबत वाद आहे तो मिटवुन दया असे म्हणुन माझ्याकडे कधी आला नाही. नारायण यांची वादी यांच्या जमीनीच्या बाजुला लागुन जमीन नाही. सुधाकर हा माझ्याकडे आपल्यात झालेल्या व्यवहाराबाबत त्यांच्यात व नारायण यांच्यामध्ये वाद असल्याबाबत सांगितले होते. त्यामुळे मी आजरोजी साक्ष देण्यासाठी न्यायालयात उपस्थिती आहे.

०८. नारायण याने सुधाकर याच्या जमीनीचा ताबा घेतल्याबाबत वाद आहे. त्यानंतर मी ताब्यासंदर्भात तपासणी केली, हे म्हणणे खरे आहे. तपासणी मोजमाप करुन केलेली नाही, हे म्हणणे खरे आहे. सुधाकर व माझे संबंध चांगले आहे त्यामुळे मी आजरोजी सुधाकर यांना मदत करण्यासाठी खोटे शपथपत्र दाखल केले, हे म्हणणे खरे

नाही. शपथपत्रातील मजकुर सुधाकर यांच्या सांगण्यावरुन लिहिला व आजरोजी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

प्रतिवादीतर्फे उलटतपास पुर्ण**......**
**फेरतपास नाही.......**

**फुलंब्री**
दि. २४/०२/२०२६.

**श्रवणोत्तर स्विकृत**
सदरचा जबाब माझ्या समक्ष नोंदवण्यात आला.

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2026.02.24 17:38:28 +0530

**(चंद्रकांत रामचंद्र पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**फुलंब्री**